देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshd
15 Aug 2025 -

## थोडक्यात

### वेदांत बलक प्रथम

**पिंपळगाव बसवंत ।** कर्मवीर गणपत दादा मोरे जनता विद्यालय, पिंपळगाव येथे झालेल्या निफाड तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात के.के. वाघ विद्याभवन भा.नगर विद्यार्थी वेदांत योगेश बलक याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याची जिल्हास्तरावरील विज्ञान मेळाव्यासाठी निफाड तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली. क्वांटम युगाची सुरुवात संभाव्यता व आव्हाने या विषयावर त्याने सादरीकरण केले. यासाठी प्राचार्य दिवाकर शेजवळ, गायत्री आंबेकर, शारदा मोरे, डॉ.कांचन बागुल, दीपक मेत्रे यांनी मार्गदर्शन केले. के.के. वाघ शिक्षण संस्था अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त शकुंतला वाघ, अजिंक्य वाघ, सचिव के.एस. बंदी, स्कूल कमिटी अध्यक्ष एस.के. नाठे, सुनीता वडघुले आदींनी अभिनंदन केले.

देशदूत
नाशिक आवृत्ती

epaper.deshd
15 Aug 2025 -

## थोडक्यात

### जनजागृती फेरी

**भा.नगर |** येथील गीताई वाघ कन्या विद्यालयात के.के. वाघ विद्याभवन, ज्युनिअर कॉलेज व के.के. वाघ युनिव्हर्सल स्कूल या तिन्ही शाळांच्या वतीने संयुक्तपणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापिका उज्वला तासकर व निफाड पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, पोलीस उपनिरीक्षक बाविस्कर, प्राचार्य दिवाकर शेजवळ व प्राचार्य मोंढे यांच्या प्रमुख उपस्थितीत फेरीचे आयोजन करण्यात आले. फेरीत मान्यवर सहभागी झाले होते. १३ ते १५ ऑगस्ट हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात आली. कारखाना कार्यस्थळावर हर घर तिरंगा जनजागृती फेरीबरोबर ड्रग्स विरोधी फेरीचेही आयोजन करण्यात आले. यावेळी सामुदायिक कवायत घेण्यात आली. बलीराम रानडे, सुनिता वडघुले, गोविंद कांदळकर, धनंजय मोरे, समीर शेख, सागर डोखळे आदींसह प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshd
15 Aug 2025 -

## थोडक्यात

### भा.नगरला शालेय मंत्रिमंडळाची स्थापना

**कसबे सुकेणे ।** भाऊसाहेबनगर के.के. वाघ विद्याभवनमध्ये इंग्लिश क्लब अंतर्गत शालेय निवडणूक उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया कशी राबविली जाते, याचे इंग्रजीमध्ये सादरीकरण केले. यासाठी त्यांनी क्रीडा मंत्री, शिक्षण मंत्री, आरोग्य मंत्री, स्वच्छता मंत्री, सहल मंत्री या विविध पदांसाठी प्रचार केला व मंत्रिपद मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी ते काय करणार, कोणत्या योजना राबविणार हे स्पष्ट केले. यानंतर उत्कृष्टरित्या मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी प्राचार्य दिवाकर शेजवळ यांनी विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व समजावून सांगितले. याप्रसंगी पर्यवेक्षिका सुनिता वडघुले, एनसीसी प्रमुख डी.के. मोरे, क्रीडा विभागप्रमुख गोविंद कांदळकर, इंग्रजी विभागप्रमुख संदीप खिरसे उपस्थित होते. संजय धनगर यांनी फलक लेखन केले. निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यासाठी ८ वी अ वर्गशिक्षिका माया पवार आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



**कसबे सुकेणे** : डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करताना शालेय कर्मचारी.

# के. के. वाघमध्ये ग्रंथपाल दिन साजरा

**कसबे सुकेणे** : भाऊसाहेब नगर येथील के. के. वाघ विद्याभवन येथे राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. 'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य दिवाकर शेजवळ, गीताईच्या मुख्याध्यापिका उज्वला तासकर, पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, बस्तीराम रानडे, संजय धनगर, मनोज तुसे, जयश्री जाधव, गणपत मोरे, भूषण ठाकरे, प्रवीण शिरसाठ, स्वप्नील जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल दीपक मोते यांनी केले.

देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdo
14 Aug 2025 -

# वाचन संस्कृतीने माणूस घडतो : शेजवळ

**कसबे सुकेणे । प्रतिनिधी**

'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी ग्रंथालये ही भूषण मानली जातात. जगात जे काही आहे उत्तम आहे, उदात्त आहे, ते ज्ञान मिळवण्याचे उत्तम साधन म्हणजेच 'ग्रंथालय'. विश्वामध्ये नावाजलेल्या बहुतांश यशस्वी व्यक्तींच्या जीवनात ग्रंथालय स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करून घेत आहेत. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र ज्याने ग्रंथालयातील ज्ञानाचे सुनियोजितरित्या व्यवस्थापन करून ती योग्य त्या स्वरूपात वाचकांपर्यंत पोहोचवणे हे ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे मूलभूत कार्य होय. प्रगत देशांमध्ये या विषयात आजपर्यंत बरेच कार्य झाले. भारतामध्ये खऱ्या अर्थाने शास्त्राचा विचार मांडण्याचे श्रेय ग्रंथपाल दिनानिमित्त केले.

देशदूत
नाशिक आवृत्ती

epaper.deshd
11 Aug 2025 -

## थोडक्यात

### भाऊसाहेबनगरचे एकपात्री नाट्यस्पर्धेत यश

भा.नगर । के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक व मुक्तांगण आयोजित गुरू-शिष्य स्मृतिमाह स्पर्धा वर्ष ४२ निमित्त घेण्यात आलेल्या एकपात्री नाट्यस्पर्धेत के.के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज भाऊसाहेबनगर विद्यार्थ्यांनी यश मिळवले. लहान गटात ऋषभ शेजवळ ६ वी ब व मोठ्या गटात संकेत त्रिभुवन १० वी अ, तसेच वादविवाद स्पर्धा इंग्रजी मोठा गट वेदांत बलक १० वी अ या तिन्ही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस रोख ६०० रु., ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळाले. प्राचार्य दिवाकर शेजवळ, सुनिता बडधुले आदींसह शिक्षकांनी स्पर्धकांचे अभिनंदन केले.

दैनिक सकाळ दि. ०४/०८/२०२५

# एनसीसी भरती प्रक्रियेचा विद्याभवनात कार्यक्रम

**कसबे सुकेणे :** भाऊसाहेबनगर (ता. निफाड) येथील के. के. वाघ विद्याभवनात आठवीतील विद्यार्थ्यांचा एनसीसी भरती प्रक्रिया कार्यक्रम झाला. प्राचार्य दिवाकर शेजवळ, पर्यवेक्षिका सुनीता वडघुले, सुभेदार विनोद डोखरे, सचिन जगदाळे, हवालदार सचिन वाजे, एनसीसीप्रमुख डी. के. मोरे आदी उपस्थित होते. सुभेदार डोखरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुभेदार सचिन जगदाळे, हवालदार सचिन वाजे यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे वजन, उंची घेत लेखी परीक्षा तसेच मैदानी प्रात्यक्षिक परीक्षा घेतली. या भरती प्रक्रियेत ४९ जागांसाठी १४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. भरती प्रक्रिया कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून एनसीसीप्रमुख डी. के. मोरे, क्रीडा विभागप्रमुख गोविंद कांदळकर, सागर डोखळे, छायाचित्रकार नाना पवार व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

दैनिक लोकनामा दि. ०८/०८/२०२५



# एकपात्री नाट्य स्पर्धेत वाघ विद्या भवनचे यश

**कसबे सुकेणे** : के.के.वाघ शिक्षण संस्था,नाशिक व मुक्तांगण आयोजित गुरू-शिष्य स्मृतिमाह स्पर्धा वर्ष ४२ यानिमित्त घेण्यात आलेल्या एकपात्री नाट्य स्पर्धेत के. के. वाघ विद्याभवन व ज्युनिअर कॉलेज भाऊसाहेबनगरच्या विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे घवघवीत यश मिळवले.

लहान गटात रिषभ शेजवळ सहावी ब व मोठ्या गटात संकेत त्रिभुवन दहावी अ,तसेच वादविवाद स्पर्धा इंग्रजी मोठा गट वेदांत बलक दहावी अ या तिन्ही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस सहाशे रुपये रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळाले.